# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/आस्था/2028 /2022-23 दि. 02/ 01 /2023

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील वरिष्ठ लिपीक या पदावर कार्यरत कर्मचारी यांना कार्यालय अधिक्षक या पदावर पदोन्नती देणेबाबत.

संदर्भ :-
1. जा.क्र.मनपा/सा.प्र./1489/2015, दि.16/12/2015 रोजीचा आदेश.
2. नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक - मिभाम-1116/प्र.क्र.36 (भाग-1)/16/नवि-28, दि.26/02/2019.
3. नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक - मिभाम-1116/प्र.क्र.35/16/नवि-28, दि.28/05/2019.
4. सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- एसआरव्ही 2018/प्र.क्र.159/कार्यासन 12, दि. 01/08/2019.
5. सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र.बीसीसी 2018/प्र.क्र.366/16-ब, दि.07 मे 2021.
6. नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक - मिभाम-1116/प्र.क्र.35/नवि-28, दि.25/11/2021.
7. मा. विभागीय पदोन्नती निवड समितीच्या बैठकीचे इतिवृत्तांत दि.27/12/2022.

## आदेश

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील वरिष्ठ लिपीक या संवर्गातील कर्मचारी यांना पदोन्नती देणेबाबत संदर्भ क्र.07 नुसार पदोन्नती समितीने शिफारस केली आहे. त्यानुसार उपरोक्त संदर्भ क्र.02 ते 06 वरील शासन निर्णयास अनुसरुन वरिष्ठ लिपीक या संवर्गातील खालील कर्मचारी यांना सेवाजेष्ठतेनुसार खुल्या प्रवर्गात निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खालील अटीशर्तीच्या अधिन राहून आदेशाच्या दिनांकापासुन पदोन्नती देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव व वेतनश्रेणी | सद्याचे पद | पदोन्नतीचे पद | नेमणूक प्रवर्ग | पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| 1. | श्री.दत्तात्रय वरकुटे<br>S-8 25500-81100 | वरिष्ठ लिपीक | कार्यालय अधिक्षक | खुला | S-14 38600-122800 |

अटीशर्ती :-

1. मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्रमांक 28306/2017 तसेच दि.07/05/2021 च्या शासन निर्णयाप्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या याचिकेवरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे.
2. पदोन्नत कर्मचाऱ्याने पदोन्नती नाकारल्यास शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, एसआरव्ही-2015/प्र.क्र.303/कार्या-12, दि.12/09/2016 मधील तरतुदींनुसार कार्यवाही करण्यात येईल.
3. सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी निवडसूचीतील अधिकारी/कर्मचाऱ्यांना नियमीतपणाचा कोणताही हक्क मिळणार नाही.
4. सद्य:स्थितीत वरिष्ठ लिपीक या पदाच्या ज्येष्ठता यादीबाबत कोणतेही न्यायालयीन प्रकरण प्रलंबित नाही तसेच या ज्येष्ठता यादीस आव्हानित देखील करण्यात आलेले नाही ही वस्तुस्थिती विचारात घेऊन पदोन्नती देण्यात येत आहे.

5. कार्यालय अधिक्षक या पदावरील पदोन्नती ही त्यांच्या विरुध्द प्रस्तुत आदेशाच्या दिनांकापर्यंत कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी सुरू झालेली नाही वा प्रस्तावित नाही या धारणेच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

6. उपरोक्त नमुद कर्मचाऱ्यानी पदोन्नतीने नियुक्तीचे आदेश प्राप्त होताच 07 दिवसात अथवा निम्नस्वाक्षरीत मंजूर करतील अशा वाढीव मुदतीत पदोन्नतीच्या पदावर हजर व्हावे. तसेच पदभार स्विकारुन त्याबाबतचा अहवाल प्रशासनास तात्काळ सादर करावा. त्याचप्रमाणे विहित मुदतीत पदोन्नतीच्या पदावर हजर न झाल्यास अथवा पदोन्नती न स्विकारल्यास पदोन्नती आपोआप रद्द होईल. तसेच सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- एसआरव्ही-1087/1131/प्र.क्र.11-89/बारा, दि.30 एप्रिल, 1991 मधील तरतुदीनुसार त्यांचे नाव निवडयादीतून काढून टाकण्यात येईल.

7. या आदेशान्वये पदोन्नती देण्यात येत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी पदग्रहण केल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत वेतननिश्चितीचा विकल्प द्यावा. असा विकल्प न दिल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम,1981 मधील नियम 11(1)(ए) व महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम, 2009 मधील नियम 13(अ)(1)(2)(ब) (1 व 2) नुसार पदोन्नतीचा दिनांक विचारात घेऊन त्यांची वेतननिश्चिती करण्यात येईल.

8. यासंदर्भात कोणताही शासन निर्णय/परिपत्रक/आदेश/कायदा/मा.न्यायालयीन आदेश/नियमातील सुधारणा इत्यादीमुळे आवश्यक असतील त्याबाबतीत सदर आदेश रद्द करणे/सुधारीत आदेश काढणे याबाबतचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांचेकडे राखुन ठेवण्यात येत आहेत.

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :- माहितीस्तव तथा पुढील कार्यवाहीस्त्व
1. अतिरिक्त आयुक्त (1/2)
2. उपायुक्त (सर्व)
3. मुख्यलेखापरीक्षक
4. मुख्यलेखाधिकारी
5. संबंधीत विभागप्रमुख/कार्यालय प्रमुख
6. संबंधितांस
7. आस्थापना निवडनस्ती

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## "मा. विभागीय पदोन्नती निवड समिती" बैठक दि.27/12/2022 रोजीचे इतिवृत्तांत"

## निवड सुची वर्ष - 01 सप्टेंबर 2022 ते 31 ऑगस्ट 2023

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील वरिष्ठ लिपीक (गट-क) (वेतनश्रेणी S-8 25500-81100) या संवर्गातील पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यास कार्यालय अधीक्षक (गट-क) (वेतनश्रेणी S-14 38600-122800) या संवर्गातील पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 54 (1) अन्वये गठीत केलेल्या पदोन्नती निवड समितीची बैठक दि.27/12/2022 रोजी दुपारी 12.30 वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्यालय, दुसरा मजला येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालीलप्रमाणे अधिकारी/पदाधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. दिलीप ढोले | आयुक्त तथा अध्यक्ष, |
| 2. | श्री. मारुती गायकवाड | उपायुक्त (मुख्यालय) तथा सदस्य सचिव, |
| 3. | श्रीम. मंजिरी डिमेलो | प्र.मुख्यलेखापरीक्षक तथा सदस्य, |
| 4. | श्री. चंद्रशेखर कांबळे | वैद्यकीय अधिकारी तथा मागासवर्गीय प्रतिनिधी, |

(मारुती गायकवाड)
उपायुक्त (मुख्यालय) तथा सदस्य सचिव
विभागीय पदोन्नती निवड समिती

(दिपक खाबीत)
कार्यकारी अभियंता तथा मागासवर्गीय प्रतिनिधी
विभागीय पदोन्नती निवड समिती

(मंजिरी डिमेलो)
प्र.मुख्यलेखापरीक्षक तथा सदस्य
विभागीय पदोन्नती निवड समिती

(दिलीप ढोले)
आयुक्त तथा अध्यक्ष
विभागीय पदोन्नती निवड समिती

**<u>आस्थापना विभागाने सादर केलेला प्रस्ताव :-</u>**

नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.36(भाग-1)/16/नवि-28, दि. 26 फेब्रुवारी, 2019 नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विभागांकरीता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या आकृतीबंधास मान्यता प्राप्त झाली आहे. तसेच नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.35/16/नवि-28, दि. 28 मे, 2019 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम- 2019 नुसार कार्यालय अधीक्षक (गट-क) या संवर्गात पदोन्नतीकरीता खालीलप्रमाणे अर्हता विहित करण्यात आली आहे.

| सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी<br>1. नामनिर्देशन<br>2. पदोन्नती<br>3. प्रतिनियुक्ती | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती |
|---|---|---|---|
| (श्रेणी - 3, प्रशासकीय सेवा) | कार्यालय अधीक्षक | पदोन्नती 100% | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वरिष्ठ लिपीक या पदावर किमान 03 वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या व विभागीय परीक्षा उत्तीर्ण असलेल्या कर्मचाऱ्यांची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |

मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत आकृतीबंधानुसार कार्यालय अधीक्षक या संवर्गातील एकुण 08 पदे मंजूर आहेत व मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम- 2019 नुसार कार्यालय अधीक्षक (गट-क) ची एकुण 08 पदे ही 100% पदोन्नतीने भरावयाची आहेत. सद्यस्थितीत 07 कार्यालय अधीक्षक कार्यरत आहेत. त्यामुळे 01 रिक्त असलेल्या पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्याचे प्रस्तावित आहे.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :-एसआरव्ही-2018/प्र.क्र.159/कार्यासन-12, दि.01 ऑगस्ट,2019 नुसार शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांना पदोन्नती देण्याकरीता अनुसरावयाच्या कार्यवाहीबाबतची एकत्रित मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात आलेली आहेत. सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र.उ(3) नुसार विचारक्षेत्रातील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांची अ.क्र. i) ते Xiii) मधील निकषांच्या आधारे पात्रता तपासणेबाबत नमुद आहे.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शान निर्णय क्रमांक :बीसीसी 2018/प्र.क्र.366/16-ब, दि.07 मे, 2021 नुसार मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.2797/2015 या प्रकरणी दि.04/08/2017 रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि.25/05/2004 च्या स्थितीनुसार सेवाजेष्ठतेने भरण्यात यावी असे निर्देश आहेत. तसेच सदर पदोन्नत्या निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 वरील अंतिम निर्णयाच्या अधिन असतील अशी कार्यवाही करताना पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ घेऊन सध्याच्या सेवाजेष्ठता यादीत वरच्या स्थानावर आलेल्या कोणत्याही मागासवर्गीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना पदावनत करण्यात येऊ नये असे निर्देश आहेत.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.दिव्यांग2015/प्र.क्र.171/16-अ, दि.23 जुलै, 2021 नुसार सर्व आस्थापनांनी गट -अ व गट-ब संवर्गातील पदोन्नतीबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि.22/07/2021 रोजीच्या निर्णयानुसार दिव्यांग आरक्षणासह पदोन्नतीसाठीची सर्व

रिक्त पदे (100%) भरण्याबाबत त्वरीत कार्यवाही करण्यात यावी. तसेच अशी कार्यवाही करताना मा.उच्च न्यायालयाच्या दि.22/07/2021 रोजीच्या आदेशाचा अवमान होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी, असे निर्देश आहेत.

| अ.क्र. | ज्येष्ठतेनुसार विचार क्षेत्रात येणाऱ्या अधिकाऱ्यांची जाती प्रवर्ग | ज्येष्ठतेनुसार विचारक्षेत्रातील प्रवर्गनिहाय अधिकाऱ्यांची नावे | ज्येष्ठता सूचीतील ज्येष्ठता क्रमांक | जन्म दिनांक व सध्याचे वय | सेवानिवृत्तीचा दिनांक | शैक्षणिक अर्हता | सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार पदोन्नतीसाठी अर्हता प्राप्त आहे/नाही | ज्या पदावरुन पुढील पदावर पदोन्नती देय आहे त्या पदावर एकुण सेवा किती व केव्हापासून | सध्याच्या पदावर जेव्हापासून सलग काम करीत आहे तो दिनांक (त्या पदाचे नाव द्यावे) पदोन्नतीचा मानीव दिनांक दिला असल्यास तो नमूद करावा | वयाच्या 50/55 व्या वर्षी झालेल्या पुनर्विलोकनाचा निर्णय | जातीचे प्रमाणपत्राची वैधता प्राप्त झाली आहे किंवा कसे? | शिस्तभंग विषयक कार्यवाही/प्राथमिक चौकशी चालू आहे/नाही (विस्तृत माहिती जोडपत्र क मध्ये नमूद करावी) | पूर्वी कधीतरी आस्थापना मंडळाने त्यांचा विचार केला होता/नाही असल्यास आ.मं.च्या बैठकीचा दिनांक व सा.प्र.वि.चा संबंधीत पत्रव्यवहार नमूद करावा. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 1. | खुला | श्री.दत्तात्रय वरकुटे | 13 | 15/05/1973 49 वर्ष | 31/05/2031 | बी.ए एल.एस.जी.डी., एल.जी.एस, डी.एल.जी.एफ.एम. एम.एस.सी.आय.टी. | आहे | 20/10/2006 पासुन (16 वर्ष) | 20/10/2006 पासुन वरिष्ठ लिपीक | लागु नाही | लागु नाही | सोबत जोडपत्र-क जोडले आहे. | नाही |
| 2. | अनु.जाती | श्रीम. माधुरी घेगडमल | 15 | 23/09/1965 57 वर्ष | 30/09/2023 | बी.ए एल.एस.जी.डी., एल.जी.एस, एम.एस.सी.आय.टी. | आहे | 20/10/2006 पासुन (16 वर्ष) | 20/10/2006 पासुन वरिष्ठ लिपीक | लागु नाही | आहे | सोबत जोडपत्र-क जोडले आहे. | नाही |
| 3. | अनु.जमाती | श्रीम.अक्षदा बाबर | 18 | 19/01/1977 45 वर्ष | 31/05/2035 | बी.ए/बी.कॉम एल.एस.जी.डी., एल.जी.एस, डी.एल.जी.एफ.एम एम.एस.सी.आय.टी | आहे | 28/09/2007 पासुन (15 वर्ष) | 28/09/2007 पासुन वरिष्ठ लिपीक | लागु नाही | आहे | सोबत जोडपत्र-क जोडले आहे. | नाही |

- विचारक्षेत्रातील खलील मागासवर्गीय कर्मचाऱ्यांनी जाती वैधता प्रमाणपत्र सादर केले आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | जात पडताळणी आहे/नाही |
|---|---|---|
| 1. | श्रीम. माधुरी घेगडमल | आहे |
| 2. | श्रीम. अक्षदा बाबर | आहे |

- विचारक्षेत्रात असलेल्या खालील कर्मचाऱ्यांचे जा.क्र.मनपा/आस्था/1773/2021-22, दि.25/11/2021 अन्वये पुनर्विलोकन करण्यात आले आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | श्रीम. माधुरी घेगडमल |

- विचारक्षेत्रात असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांनी संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर केले आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | श्री. दत्तात्रय वरकुटे |
| 2. | श्रीम. माधुरी घेगडमल |
| 3. | श्रीम. अक्षदा बाबर |

- विचारक्षेत्रात असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांनी सेवा प्रवेश नियमानुसार जा.क्र.मनपा/आस्था/414/2019-20, दि.19/06/2019 अन्वये विभागीय परिक्षा उत्तीर्ण होण्यामधुन सुट देण्यात आली आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | श्री. दत्तात्रय वरकुटे |
| 2. | श्रीम. माधुरी घेगडमल |
| 3. | श्रीम. अक्षदा बाबर |

- विचारक्षेत्रातील खालील कर्मचात्यांची परिविक्षाधीन कालावधीकरीता नेमणूक करण्यात आलेली नाही.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | श्रीम. माधुरी घेगडमल |

- विचारक्षेत्रात असलेल्या खालील कर्मचाऱ्यांनी परिविक्षाधीन कालावधी समधानकारकरित्या पूर्ण केला असल्यामुळे त्यांचा परिविक्षाधीन कालावधी समाप्त करण्यात आला आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | श्री. दत्तात्रय वरकुटे |
| 2. | श्रीम. अक्षदा बाबर |

- विचार क्षेत्रात असलेल्या वरिष्ठ लिपीक कर्मचाऱ्यांपैकी कोणीही अपंग कर्मचारी म्हणून कार्यरत नाही.
- विचारक्षेत्रातील खालील कर्मचाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी सुरू नाही.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | श्री. दत्तात्रय वरकुटे |
| 2. | श्रीम. माधुरी घेगडमल |
| 3. | श्रीम. अक्षदा बाबर |

- विचारक्षेत्रातील खालील कर्मचारी जा.क्र.मनपा/आस्था/1007/2021-22, दि.02/08/2021 अन्वये स्थायित्व प्रमाणपत्र दिलेले आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | श्री. दत्तात्रय वरकुटे |
| 2. | श्रीम. माधुरी घेगडमल |
| 3. | श्रीम. अक्षदा बाबर |

- विचारक्षेत्रातील वरिष्ठ लिपीक कर्मचारी यांना जा.क्र. मनपा/आस्था/1088/2021-22, दि.11/08/2021 व .क्र. मनपा/आस्था/1089/2021-22, दि.11/08/2021 अन्वये हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासुन सुट देण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | श्री. दत्तात्रय वरकुटे |
| 2. | श्रीम. माधुरी घेगडमल |
| 3. | श्रीम. अक्षदा बाबर |

- विचारक्षेत्रातील वरिष्ठ लिपीक कर्मचारी यांना जा.क्र मनपा/आस्था/1087/2021-22 दि.11/08/2021 व जा.क्र मनपा/आस्था/1162/2021-22 दि.24/08/2021 अन्वये मराठी एदर्थ मंडळाची भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासुन सुट देण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | श्री. दत्तात्रय वरकुटे |
| 2. | श्रीम. माधुरी घेगडमल |
| 3. | श्रीम. अक्षदा बाबर |

- विचारक्षेत्रातील खालील वरिष्ठ लिपीक या संवर्गाची सन 2020 च्या अंतिम सेवा ज्येष्ठता यादीनुसार ज्येष्ठता क्रम खालीलप्रमाणे

| अ.क्र. | ज्येष्ठता क्रमांक | कर्मचाऱ्याचे नाव | अभिप्राय |
|---|---|---|---|
| 1. | 13 | श्री. दत्तात्रय वरकुटे | |
| 2. | 15 | श्रीम. माधुरी घेगडमल | |
| 3. | 18 | श्रीम. अक्षदा बाबर | |

- मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.28306/2017 च्या अधिन राहुन सामान्य प्रशासन विभाग (का.16-ब), शासन निर्णय दि.07/05/2021 मधील तरतुदीनुसार पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाजेष्ठतेनुसार मा.सर्वोच्य न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहुन तात्पुरती पदोन्नती देण्यात यावी. असे निर्देश असल्याने सोबत जोडलेल्या सन 2004 च्या अंतिम सेवा ज्येष्ठता यादीनुसार निवडसुची खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | ज्येष्ठता क्रमांक | कर्मचाऱ्याचे नाव |
|---|---|---|
| 1. | 94 | श्री. दत्तात्रय वरकुटे |
| 2. | 107 | श्रीम. माधुरी घेगडमल |
| 3. | 120 | श्रीम. अक्षदा बाबर |

- त्याअनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यालय अधिक्षक या पदाची 01 रिक्त पदे पदोन्नतीने भरावयाची असल्यामुळे खालील वरिष्ठ लिपीक कर्मचारी यांनी कार्यालयीन अधिक्षक या पदावर पदोन्नती देण्यासाठी वरिष्ठ लिपीक या पदाचा 03 वर्षाचा अनुभव धारण केलेला आहे. व त्यांना विभागीय परिक्षा उत्तीर्ण होण्यामधुन सुट देण्यात आली आहे. त्यामुळे खालील वरिष्ठ लिपीक यांना कार्यालय अधिक्षक या पदावर मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.28306/2017 च्या अधिन राहुन निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेस शिफारस आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | शेरा |
|---|---|---|
| 1. | श्री.दत्तात्रय वरकुटे | |

<u>विभागीय पदोन्नती निवड समितीचा निर्णय :-</u>

सदर प्रस्तावाचे वाचन करुन समितीने खालील अटीशर्तीच्या अधिन राहुन खालील कर्मचारी यांना कार्यालय अधिक्षक (गट-क) या पदावर पदोन्नती देणेकरीता निर्णय घेण्यात आला.

1. मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यालय अधिक्षक या पदाची 01 रिक्त पदे पदोन्नतीने भरावयाची असल्यामुळे खालील वरिष्ठ लिपीक कर्मचारी यांनी कार्यालय अधिक्षक या पदावर पदोन्नती देण्यासाठी वरिष्ठ लिपीक या पदाचा 03 वर्षाचा अनुभव धारण केलेला आहे. व त्यांना विभागीय परिक्षा उत्तीर्ण होण्यामधुन सुट देण्यात आली आहे. त्यामुळे खालील वरिष्ठ लिपीक यांना कार्यालय अधिक्षक या पदावर मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.28306/2017 च्या अधिन राहुन निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेकरीता निवड करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | श्री.दत्तात्रय वरकुटे |

2. वरील कर्मचाऱ्यांच्या शैक्षणिक पात्रतेची कागदपत्रे पडताळणीच्या तसेच सेवा व वेतन पडताळणीच्या अधिन राहुन लाभ मंजुर करण्यात येत आहे. वेतन निश्चितीनंतर वेतन पडताळणी पथकाकडुन त्याची पडताळणी करुन घेणेत यावी.
3. वरील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या अटीशर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र घेण्यात यावे.
4. कोणत्याही मा.न्यायालयाचा निर्णय संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांचेवर बंधनकारक राहील.
5. वरील कर्मचाऱ्यांना सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक :- बीसीसी-2018/प्र.क्र.366/16-ब, दि.07 मे, 2021 नुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 वरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून सेवाजेष्ठतेनुसार खुल्या प्रवर्गातून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेबाबत पदोन्नती समिती शिफारस करीत आहे.

(मारुती गायकवाड)
उपायुक्त (मुख्यालय) तथा सदस्य सचिव
विभागीय पदोन्नती निवड समिती

(दिपक खाबीत)
कार्यकारी अभियंता तथा मागासवर्गीय प्रतिनिधी
विभागीय पदोन्नती निवड समिती

(मंजिरी डिमेलो)
प्र.मुख्यलेखापरीक्षक तथा सदस्य
विभागीय पदोन्नती निवड समिती

(दिलीप ढोले)
आयुक्त तथा अध्यक्ष
विभागीय पदोन्नती निवड समिती